हॅलो प्रभात
# अहिल्यानगर
जिल्हा विशेष ■ सोमवार, १७ नोव्हेंबर २०२५





# शहराच्या सर्वांगीण विकासासाठीच आपली उमेदवारी : काका कोयटे

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

व्यक्तिगत टिका टिपणीत आपल्याला स्वारस्य नाही. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आपण नगराध्यक्षपदासाठी उमेदवारी करीत आहोत. उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी आमदार अशोक काळे आणि आमदार आशुतोष काळे यांच्या पाठबळावर आपण शहराचा विकास करू. आपल्या पत्नी सुहासिनी कोयटे या नगराध्यक्ष असतानाच्या काळात झालेली विकासकामे जनतेसमोर आहेत. अशा शब्दात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार काका कोयटे यांनी आपली भूमिका माध्यमांशी बोलताना व्यक्त केली.



ते म्हणाले, आपल्या पत्नी सुहासिनी कोयटे नगराध्यक्ष असताना कोपरगावमधील बेट, खडकी आणि लक्ष्मी नगर परिसर या भागात पाण्याच्या टाक्या उभारण्यात आल्या. ओपन थेटर जवळील शॉपिंग सेंटर, नेहरू भाजी मार्केट जवळील शॉपिंग सेंटर, बसस्थानका जवळील शॉपिंग सेंटर, शाळा क्र.१ म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्या मागील शॉपिंग सेंटर विविध ठिकाणी व्यापारी संकुले उभारली. हा व्यापारी संकुले उभारताना एकाही मुळ दुकानदाराला विस्थापित न करता त्यांनाच जागा उपलब्ध करून दिल्या. साई सिटी परिसरात त्यांनी उभारलेले योग मंदिर आणि आरोग्य मंदिर हे आरोग्यवर्धक उपक्रम शहरवासियांना भावले आहे.

निवारा वसाहतीसह महादेव मंदिर परिसर, हनुमान मंदिर परिसर, गणेश मंदिर परिसर, जगदंबा मंदिर परिसर या ठिकाणचे ओपन स्पेस विकसित करून सुशोभीकरण केले. समता उद्यान, ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र असे विविध उपक्रम तेथे राबवीले.

> राजकारणापासून काही काळ दूर होतो. तरीही कोपरगाव बसस्थानकाचे सुशोभीकरण, वृक्ष लागवड, माणुसकीचे मंदिर' स्थापन करून गरजूंसाठी कपडे, पादत्राणे, औषधांचे वितरण यांसारखे उपक्रम सातत्याने राबवीले. शहरातील विद्यार्थ्यांसाठी अभ्यास मंदिर उभारले त्यात १९० हून अधिक विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासाची सुविधा उपलब्ध आहे. सहकार मंदिर उभारून महिलांना अगरबत्ती, धूप, वाती आदी उत्पादन प्रशिक्षण दिले. उत्पादनांची विक्री व्यवस्था निर्माण केली.
>
> **– काका कोयटे**

## पाटस टोल प्लाझाची हुकुमशाही सोबतीला दौंड वनविभाग



## हजारो झाडांची निर्दयीपणे कत्तल शासनाच्या दिव्याखाली अंधार

**दौंड : हॅलो प्रभात**

पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्ग पाटस येथील अनेक झाडांचा बळी गेला. किती झाडे तोडली असतील हे या मार्गावरुन प्रवास करताना जाणवते. महामार्गावर वृक्षांचे संवर्धन, संरक्षण होताना दिसत नाही आहे. वृक्ष तोडीकडे वन विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने या वृक्षांचे संवर्धन संरक्षण मोहिमेचा दौंड तालुक्यात फज्जा उडाल्याचे दिसत आहे. याचे कारण असे की, पाटस टोल प्लाझाने महामार्गावरील हजारो डेरेदार झाडांची कत्तल केली आहे. यामध्ये वन विभागाचा खूप मोठा संबंध असल्याचे बोलले जात आहे. महत्त्वाचे म्हणजे या जागी वन विभागाच्या आशीर्वादाने झाडांची कत्तल केली असल्याचा आरोप नागरिक करीत आहेत. त्यामुळे दौंड हरित पट्ट्याला मोठा धोका निर्माण झाला आहे. परंतु याचे थोडे ही गांभीर्य वनविभागाला नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे दौंड वनविभाग टोल प्लाझा पाटसच्या दावणीला तर नाहीना बांधला गेला असे बोलले जात आहे.झाडाच्या कत्तली प्रकरणी टोल प्लाझा पाटस यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करून संबंधित वन विभागाची सखोल चौकशी लावून त्यांना कठोर शासन करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. जर कारवाई नाही झाली तर वेळ पडल्यास आंदोलन ही केले जाईल असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

**कोणती झाडे तोडण्यास परवानगी?**

खाजगी जमिनीवरील धोकादायक तसेच वाळलेली, शेतीस अडथळा निर्माण करणारी, विजेच्या तारांना अडथळा निर्माण करणारी झाडे पुर्व परवानगी घेऊन छाटता येतात किंवा तोडता येतात. परंतु पाटस टोल प्लाझा कंपनीने धोकादायक वाळलेली झाडे जाग्यावरच ठेवून हिरवीगार डेरेदार वृक्ष तोडून आपली कामगिरी चोख बजावली आहे.

## आविष्कार स्पर्धेत तृप्ती महाडिकचे यश

**पलूस : हॅलो प्रभात**

भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी येथील तृतीय वर्ष बी. फार्मसीची विद्यार्थिनी कु. त्रुप्ती उद्धव महाडिक हिने विद्यापीठ क्षेत्रीय स्तरावरील आविष्कार २०२५-२६ संशोधन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून महाविद्यालयाचे नाव विद्यापीठ पातळीवर उज्ज्वल केले आहे. तिला स्पर्धेत प्रथम क्रमांकासाठी मानचिन्ह आणि प्रमाणपत्र मिळाले. तिची पुढील स्पर्धा आंतरक्षेत्रीय पातळीवर होणार आहे.



विद्यार्थिनी त्रुप्ती महाडिक हिच्या या यशामागे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक ए. हजारे, मार्गदर्शक डॉ. समीर जे. नदाफ तसेच आविष्कार समन्वयक प्रणव सावेकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.महाविद्यालयाचे व्यवस्थापन, प्राचार्य, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांनी त्रुप्तीचे मनः पूर्वक अभिनंदन करून तिच्या भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# अखेर धुमाकूळ घालणारा नरभक्षक बिबट्या ठार

## ठार मारण्यात वनविभाग प्रशासनाला यश

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

येसगाव व कोपरगाव परिसरात ५ आणि १० नोव्हेंबर रोजी दोन जणांचा बिबट्याच्या हल्लूयात मृत्यू झाल्याने परिसरात तणाव निर्माण झाला होता. या परिस्थितीत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नागपूर यांच्या आदेशानुसार वन विभागाच्या पथकाने १४ नोव्हेंबर रोजी टाकळी सोनारीजवळ नरभक्षक बिबट्याचा बंदोबस्त केला.



दोन सलग घटनांनंतर नागरिकांनी अहिल्यानगर-मनमाड महामार्गावर रास्ता रोको केला होता. नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत वन विभागाने शोधमोहीम राबवून बिबट्याचा मागोवा घेतला. टाकळी आश्रमशाळेमागील परिसरात उपस्थिती आढळताच कोपरगाव वनपरिक्षेत्राच्या पथकाने शार्पशूटर टीमसह तत्काळ कारवाई करून रात्री ९.४५ वाजता बिबट्याचा बंदोबस्त केला.

अंदाजे पाच ते सहा वर्षांचा नर बिबट मृत अवस्थेत मिळून शवविच्छेदनासाठी बारागाव नांदूर रोपवाटिकेत हलविण्यात आला.

ही कारवाई मुख्य वनसंरक्षक नाशिक (प्रा) म ल्लिकार्जुन आणि उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक वनसंरक्षक गणेश मिसाळ, वनपरिक्षेत्र अधिकारी निलेश रोडे, सुनील साळुंके, सागर केदार, सुभाष सांगळे, वाघूलकर, शार्पशूटर राजीव शिंदे व टीम, तसेच रेस्क्यू अँड एनिमल सपोर्ट टीम नाशिक-पुणे यांच्या सहकार्याने पार पडली. कोपरगाव, राहुरी, संगमनेर वनपरिक्षेत्र आणि फिरते पथक अहिल्यानगर यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी सहकार्य केले.

# चाचा तनपुरे यांचे कट्टर सुनील पवार यांचा भाजपात प्रवेश

**राहुरी : हॅलो प्रभात**

चाचा तनपुरे यांचे कट्टर समर्थक राहुरी नगरपरिषदचे माजी नगरसेवक सुनील पवार यांनी नामदार राधाकृष्ण विखे यांच्या उपस्थितीत भाजप पक्षात प्रवेश केला. त्यामुळे आता राहुरी नगरपरिषद निवडणूक साठी भाजप पक्षाकडून नगराध्यक्ष पदासाठी सुनील पवार यांचे नाव निश्चित झाल्याची चर्चा तालुक्यात सुरू आहे. सुनिल ठकाजी पवार हे अनेक वर्षापासून रावसाहेब चाचा तनपुरे यांचे कट्टर समर्थक म्हणून मानले जात होते. सुनील पवार हे काही वर्षापूर्वी रावसाहेब चाचा तनपुरे यांच्या विकास मंडळ गटातून नगरसेवक पदासाठी निवडून आले होते.



सध्या चाचा तनपुरे यांनी राहुरी नगरपरिषद निवडणूकसाठी आपली भूमिका अद्याप निश्चित स्पष्ट केली नाही. राहुरी नगरपरिषदचे नगराध्यक्ष पद एस टी प्रवर्गातील पुरुषसाठी आरक्षित झाले. सुनील पवार हे एसटी प्रवर्गातील असल्याने त्यांनी नगराध्यक्ष पदासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. मात्र चाचा तनपुरे गटाकडून आणि जनसेवा मंडळाकडून त्यांना प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे नाराज होऊन अखेर त्यांनी चाचा तनपुरे गटाला रामराम ठोकला. लोणी येथे झाले झालेल्या एका कार्यक्रमात नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत भाजप पक्षात प्रवेश केला.

त्यामुळे राहुरी नगरपरिषद निवडणूक मध्ये भाजप पक्षाकडून नगराध्यक्ष पदासाठी सुनील ठकाजी पवार यांचे नाव जवळपास निश्चित झाले. अशी चर्चा तालुक्यात सुरू आहे.

सुनील पवार यांच्यासह राहुरी येथील अमोल कैलास काशिद, संतोष जगधने, काकासाहेब आढगळे, विकास जगधने, कांतिलाल जगधने, राहुल विजय जाधव, श्रीकांत जाधव, बाळासाहेब काशिनाथ इरुळे, सुधाकर जाधव, आराध्य जाधव, सुहास जाधव, बाबासाहेब जगधने, ओम जाधव, अनिल खांदे, निलेश जाधव यांनी भाजप पक्षात जाहीर प्रवेश केला.याप्रसंगी आर आर तनपुरे, अण्णासाहेब शेटे, विराज धसाळ, भैयासाहेब शेळके, गणेश खैरे, सचिन मेहेत्रे, राजेंद्र उंडे, सतीश फुलसौंदर, नयन शिंगी, नारायण धोंगडे, अमोल काशीद, विजय जाधव, आबासाहेब येवले, सागर शेटे, सचिन जाधव, अनिल कवडे, संतोष येवले, कांतीलाल जगधने, रवी येवले, अजित डावखर, बाळासाहेब इरोले, सुजय काळे, राम शिंदे, अरुण डौले आदि मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजूभाऊ शेटे पाटील यांचा शिंदे गटात प्रवेश

### राहुरी तालुक्यात नवे राजकीय समीकरण

**राहुरी : हॅलो प्रभात**



राहुरी तालुक्यातील धर्मवीर संभाजी महाराज प्रतिष्ठानचे अध्यक्ष तसेच शेतकरी विकास मंडळाचे अध्यक्ष रामचंद्र उर्फ राजूभाऊ शेटे पाटील मुंबई येथे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षाचे मुख्य नेते नामदार एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शेकडो कार्यकर्त्यांसह प्रातिनिधिक स्वरूपात शिवसेनेत प्रवेश केला. या प्रवेश सोहळ्यावेळी शिवसेना पक्षाचे प्रवक्ते इंजि. संजीव भोर, जिल्हा प्रमुख (दक्षिण) बाबुशेठ टायरवाले, राहुरी तालुका प्रमुख देवेंद्र लांबे, युवा सेना तालुका प्रमुख सचिन करपे यांच्यासह अनेक वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित होते.राजूभाऊ शेटे पाटील यांच्या शिंदे गटात प्रवेशाबाबत गेल्या काही दिवसांपासून चर्चा रंगल्या होत्या. विधानसभा निवडणुकीदरम्यान त्यांनी महायुतीचे उमेदवार दिवंगत आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या प्रचारात सक्रिय सहभाग नोंदवला होता. त्यावेळी ते नामदार एकनाथ शिंदे यांचे कट्टर कार्यकर्ते म्हणून ओळखले जात होते. राहुरी तालुक्यातील बा.बा. तनपुरे सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत त्यांनी शेतकरी विकास मंडळ स्थापन करून सर्वसामान्य ऊस उत्पादकांना सोबत घेत पहिल्यांदाच निवडणूक लढवली होती. राजकीय पक्षाचा पाठिंबा नसतानाही त्यांनी तुल्यबळ लढत देत आपली ताकद दाखवून दिली होती. या निवडणुकीत राजकीय पाठबळ मिळाले असते, तर निकाल वेगळा लागला असता, अशी प्रतिक्रिया तालुक्यातून उमटली होती.राजूभाऊ शेटे पाटील यांच्या पक्षप्रवेशावेळी नामदार एकनाथ शिंदे यांनी त्यांचे स्वागत करताना सांगितले की, राजूभाऊ आणि त्यांच्या कार्यकर्त्यांच्या सहभागामुळे अहमदनगर जिल्ह्यात शिवसेनेची ताकद वाढेल आणि येणाऱ्या निवडणुकांमध्ये याचा सर्वसामान्य कार्यकर्त्यांना मोठा फायदा होईल.या पार्श्वभूमीवर आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच राहुरी नगरपालिकेच्या निवडणुकांपूर्वी शेटे पाटील यांच्या प्रवेशामुळे तालुक्यातील राजकारणाला नवे वळण मिळाले आहे. राजूभाऊ शेटे-पाटील यांनी पक्षप्रवेशानंतर प्रतिक्रिया देताना सांगितले की, राहुरी तालुक्यात 'गाव तिथे शिवसेना शाखा' हा उपक्रम राबवून शिवसेनेचे बळ तळागाळापर्यंत पोहोचविण्याचा आमचा मानस आहे. नामदार एकनाथ शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली सर्वसामान्य कार्यकर्त्यांना राजकारणात स्थान मिळवून देण्यासाठी मी कटिबद्ध आहे.याप्रसंगी धनंजय घुगरकर, ज्ञानेश्वर टेकाळे, सतीश बोरुडे, अ‍ॅड. भाऊसाहेब पवार, उमेश खिलारी, चंद्रकांत आढाव, मा.सरपंच सुभाष जुंदरे यांच्यासहं कार्यकर्ते उपस्थित होते.

## विवेक कोल्हे यांच्या व्हिजनरी नेतृत्वावर दडीयाल प्रभावित




## दडीयाल यांचा भाजपमध्ये प्रवेश काळे आणि कोयटे यांना धक्का

**कोपरगांव: हॅलो प्रभात**

कोपरगावमध्ये एक महत्त्वपूर्ण राजकीय घडामोड घडली असून, ठाकरे गट शिवसेनेचे माजी शहरप्रमुख कलविंदरसिंग दडीयाल आणि गुरमितसिंग दडीयाल यांनी आपल्या समर्थकांसह भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला आहे. मा.आ. स्नेहलताताई कोल्हे आणि भाजप जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर यांच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा उत्साहात पार पडला.भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते रविकाका बोरावके, हरिभाऊ गिरमे, कैलास खैरे, नरेंद्र डंबीर, नसीरभाई सय्यद,विनोद राक्षे,सुशांत खैरे,नितीन वानखेडे,हुसेन सय्यद आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.शहरातील सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी आणि विकासाभिमुख राजकारणासाठी स्पष्ट भूमिका मांडणाऱ्या युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांच्या व्हिजनरी नेतृत्वावर विश्वास ठेवून दडीयाल बंधूंसह कार्यकर्त्यांनी भाजपचा झेंडा हातात घेतला. विवेकभैय्या यांनी अल्पावधीतच सेवा आणि स्वच्छ राजकारणाचा ठसा उमटवला असून, त्यांच्याभोवती वाढणारा जनसमर्थनाचा उंचावलेला आलेख आजच्या प्रवेशातून पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.दुसरीकडे, केवळ वैयक्तिक स्वार्थासाठी राजकारण करणाऱ्या काका कोयटेंच्या आणि आमदार काळे यांच्या मनसुब्यांना युवानेते विवेकभैय्यांनी एकाच दिवसात सुरुंग लावल्याची चर्चा राजकीय वर्तुळात जोरात आहे. कोपरगावच्या भविष्याकडे पाहताना, स्वच्छ नेतृत्व आणि पारदर्शकतेवर आधारित राजकारणाची जनतेची अपेक्षा वाढत असताना, आजचा प्रवेश हा शहराच्या राजकीय समीकरणात मोठा बदल घडवणारा ठरला आहे. भारतीय जनता पार्टीच्या सबका साथ, सबका विकास या तत्वज्ञानावर विश्वास ठेवत दडीयाल बंधूंनी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला आहे.यासह लवकरच यापेक्षाही मोठा धमाका होणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले आहे.

# चला उमेदवारी अर्ज भरायला ; विकासाचं कमळ फुलवायला

## भाजपा,आर.पी.आय. लोकसेवा आघाडीचे उमेदवार आज उमेदवारी अर्ज दाखल करणार

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

भारतीय जनता पार्टी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आणि लोकसेवा आघाडी कोपरगाव यांच्या सर्व उमेदवारांचा उमेदवारी अर्ज १७ नोव्हेंबर रोजी भरला जाणार आहे.

संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे, माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली व युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांच्या नेतृत्वात नगराध्यक्ष पदाचे उमेदवार संधान पराग शिवाजी व नगरसेवक पदाचे सर्व उमेदवार यांचे अर्ज दाखल केले जाणार आहे. कोपरगाव शहराला सातत्याने भेडसावत असणाऱ्या समस्या या सुटण्यासाठी सक्षम आणि प्रत्यक्ष मैदानात उतरून काम करणारे नेतृत्व गरजेचे आहे. रस्ते पाणी आरोग्य स्वच्छता या समस्या मोठ्या प्रमाणावर भेडसावत आहे. नागरिकांना मूलभूत सुविधा देण्यामध्ये पालिका प्रशासन आणि आमदार हे कमकुवत ठरले आहे.

चार वर्षापासून प्रशासक असताना सर्वाधिकार आमदारांकडे होते मात्र शहरात समस्यांचा महापूर दिवसेंदिवस वाढत राहिला. यावर ठोस काम करणारे नेतृत्व म्हणून नगराध्यक्ष पदासाठी पराग संधान आणि त्यांच्या समवेत नगरसेवक पदाचे सर्व उमेदवारांचे अर्ज दाखल करून प्रचाराची रंगत येणार आहे.

यावेळी सकाळी १० वाजता पदयात्रा निघणार असून साहित्यरत्न लोकशाहीर डॉ.आण्णाभाऊ साठे स्मारक, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक, विघ्नेश्वर मंदिर, दत्त मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक व त्यानंतर तहसील मैदान कोपरगाव या ठिकाणी सर्व एकत्रितरित्या जाणार आहेत.